कार्यालय नगर परिषद,भोकरदन जिल्हा. जालना.

ई-मेल cobhokardhan@gmail.com
कार्यालय दुरध्वनी क्रं. 02485-244213
संकेत स्थळ : www.bhokardanmc.org

मुख्य प्रशासकीय ईमारत
भोकरदन, जि.जालना (म.रा)
पिन कोड. 431114

जा.क्र.17/नपभो/माअवि/कावी- 226

दिनांक :11/5/2017

प्रति,
श्री. गौतम कचरुदास संचेती,
रा.भोकरदन,जि.जालना.

विषय : सर्वे न.५७ च्या भूमि अभिन्यासास अंतिम मंजुरी मिळणे बाबत.

संदर्भ : १) मा. नगर रचनाकार जालना यांचे पत्र क्र. जा.क्रं./अकृषीकपरवानगी/मौ. भोकरदन/ नरजा ४२७ दिनांक २७ एप्रिल २०१७

२)सूचना पत्र जा.क्र.१७/नपभो/वियो/कावी-२०७दि.२९/०४/२०१७

उपरोक्त विषयांकित संदर्भ क्र.१ मौजे.भोकरदन,ता.भोकरदन येथील जमीन सर्वे न. ५७ मधील १४३३२.१७ चौ.मि. क्षेत्राचे निवासी प्रयोजनार्थ नगररचनाकार जालना यांनी अंतिम मंजुरीची शिफारस केलेली आहे.तसेच संदर्भ क्र. २ अन्वये मा.जिल्हाधिकारी जालना यांनी निवासी प्रयोजानार्थ अकृषिक वापर मान्यता प्रदान केलेली आहे. न.प.ची मान्यता घेण्यासाठी सदर्भ क्र.३ नुसार सूचना पत्र दिलेले होते सदरील अभिन्यासा मध्ये एकूण (१२२) भुखंड असून भुखंड क्र.१ ते १२२ हया पूर्ण भूखंडाचे शुल्क भरणा केल्या असल्याने अटी नुसार नगरपरिषदेची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१.अभिन्यासातील खुली जागा वगळता सर्व भुखंड निवासी उपयोगासाठीच वापरावेत.

२.अभिन्यासातील १० टक्के खुली जागा नेहमी करीता सार्वजनिक वापरासाठी खुली ठेवण्यात यावी.

३.अभिन्यासातील कोणत्याही भुखंडाची भविष्यात विभागणी करण्यात येऊ नये.

४.अभिन्यासातील रस्ते व खुली जागा खालील क्षेत्र नाम मात्र शुल्कात हस्तांतरित केले आहे ते अभिन्यासाच्या उपयोगा साठी वापर अनुज्ञेय असेल.

५.सदरिल क्षेत्रास महसूल खात्या मार्फ़त अकृषिक मान्यता आहे. अभिन्यासातील भागास: भुखंडाचे शुक्ल भरणा करने बाकि असुन ते भरणा केल्यावर भुखंडाची विक्री अनुज्ञेय राहील.

६.जमीन मालकाने स्थानिक प्राधिकरणा कडे विकास परवानगी घेणे तसेच विहित विकास शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहील.

७. अभिन्यासातील भुखंडा मध्ये स्थानिक प्राधिकरण्याचा पूर्व परवानगी शिवाय कोणतेही बांधकाम अनुज्ञेय होणार नाही.

८. अभिन्यासातील भुखंडावर बांधकाम करताना ब व क वर्ग नगरपरिषदा करीता लागु असलेल्या प्रमाणित बांधकाम उपविधि तसेच विकास नियंत्रण नियमावली चे पालन करणे आवश्यक आहे.

९. अभिन्यासास पोहोच रस्ता उपलब्ध करुण घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

१०.इतर सर्व बाबतीत स्थानिक प्राधिकरण चे नियम बंधनकारक राहतील.

११.सर्व भुखंडाचे शुल्क भरणा केल्याने मान्यता प्रदान करण्यात येत असुन ज्या भुखंडाचे शुल्क भरणा करणे बाकि आहे त्या बाबतीत कोणत्याच प्रकारच्या नमुना न. ४३, नाहरकत प्रमाणपत्र मीळणार नाही याची नोंद घ्यावी.

१२. ज्या भुखंडाचे क्षेत्रफळ १०१ ते १५० चौ.मी आहे अश्या भुखंडावर सेमी डीटचड पद्धतीने व् ज्या भुखंडाचे क्षेत्रफळ १५० चौ.मी. व् त्यापेक्षा जास्तीचे आहे अश्या भुखंडावर डीटचड पद्धतीने बांधकाम अनुज्ञेय राहील.
१३. या सोबत अंतिम मंजुर भुमी अभिन्यासाची प्रत सलग्न करण्यात येत आहे.

मुख्याधिकारी
नगरपरिषद, भोकरदन

वसुली विभाग प्रमुख न.प.भोकरदन याना देऊन आदेशित करण्यात येते की सबंधित अभिन्यास धारकाचे(१२२) भुखंड असुन तद नंतर खुली जागा १४३३२.१७ चौ.मी. येणे प्रमाणे भुखंडाच्या नोंदी अभिलेखास घेण्यात याव्यात. ज्या भुखंडाचे कर भरणा केले आहे त्याच्या नक्कला नमुना ४३ नाहरकत प्रमाणपत्र विक्रीसाठी देणे अनुज्ञेय राहील, उर्वरित कोणत्याही भुखंडाच्या नमुना ४३ नाहरकत देण्यात येवु नयेत.

मुख्याधिकारी
नगरपरिषद, भोकरदन